# कोरोना: जागतिक व्यवस्थेतील बदल

**डॉ.अजय पेत्रस बोरकर,** (कार्यकारी प्राचार्य), सिध्दार्थ महाविद्यालय, चिचपल्ली, ता. जि. चंद्रपुर

**सारांश—**

कोरोना व्हायरस अख्या जगालाच अस्थिरतेच्या उंबरठयावर आणून ठेवल आहे. ही अस्थिरता कधी संपेल, जीवन सर्वसामान्य कधी होईल, कधीच सांगता येत नाही. अजूनही अनेक देश आपआपल्या अपुऱ्या आरोग्यसेवेशी कोरोनाशी लढण्याचा प्रयत्न करीत आहे. मृताची संख्या रोज वाढत आहे. अख्या जगाचा व्यापार—उदीम ठप्प झाला आहे.

जागतीक व्यापार संघटनेने या बद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. जगातला कोणताही देश यातून सुटणार नाही अस सांगताना जागतीक व्यापार संघटना वस्तुस्थितीवर नेमक बोट ठेवत आहे. आजच्या घडीलाच कोरोनामुळेच जागतीक व्यापाऱ्याला सुमारे तीस टक्के फटका बसला आहे. अनेक देशासाठी हा आघात वेगवेगळा असला तरी कोणत्याही देशासाठी दोन ओकडयापेक्षा कमी नाही.

कि वर्ड— कोरोना, जग, जीवन, देश, आरोग्यसेवा, प्रयत्न, मृत, व्यापार, संघटना, आघात इ.

**प्रस्तावना**

**कोरोना विषाणुचा इतिहास:—**

कोरोना विषाणु प्रथमत:१९३० च्या दशकात प्राण्यामध्ये रोगकारक अस्तित्व म्हणून आढळला. १९३० च्या सुमारास तो मानवी श्वसन संस्थेत संसर्गरोग निर्माण करणारा घटक आहे असे समजले. मानवी कोरोना विषाणु या सदराखाली प्रथम निदर्शनास आलेले कोरोना विषाणु म्हणजे २२९E, OCut, OCrwआदीचे वर्णन आहेत. परंतु त्याचे सखोल असे अन्वेषण झालेले दिसत नाही. कोरोना विषाणु सदृश कण प्रामुख्याने नवजात शिशूंच्या विष्टेत ग्योस्टोइंटेरायटीस आणि एनडोकार्डायटीस संभाव्य रोगकारक अस्तित्व म्हणुनही मिळालेत. परंतु तत्कालीन तांत्रीक मर्यादा त्यांचा बारकाईने अभ्यास होवु शकला नाही व पाहीजे त्या प्रमाणात त्यांना नियंत्रण करता आले नाही.

कोरोना विषाणु त्याच्या अजून वेगळया स्वरूपात प्रकटला ते २००३ च्या जागतीक उद्रेकात. म्हणजे सार्स (Severe acute respiratory Syndrome-SARS) आणि त्यावेळी त्याच्या त्या रूपाचे नाव होते सार्स कोरोना विषाणु. नविन श्वसनसंस्था रोगकाकरक म्हुणुन हा उद्रेक साधारण नऊ महिने चालला. त्याचा सुमारे ८०० लोकांना संसर्ग झाला. व अंदाजे ७७५ लोकांचा जीव त्याने घेतला. दररोज मृतांची व लागण संस्थेत वाढ होवु लागली. बरेच तज्ञांचे असे मत आहे की सार्स कोरोना विषाणुंची उक्रांती सार्स कोरोना विषाणुदृश विषाणूपासून त्याच्या नैसर्गिक स्त्रोता पासुन झाला असल्याचे मत आहे.

सार्स उद्रेक हा २००३ मध्ये नियंत्रणात झाला व विषाणुने पुन्हा डोके वर काढले नाही. नविन कोरोना विषाणू २००२ मध्ये मध्य पुर्व जगात उदयास आला. त्याचे नाव 'मर्स कोरोना विषाणू' तो सौदी अरेबियात व इतर मध्य पुर्व देशात बऱ्याच श्वसनसंस्था संसर्गांना कारणीभुत असल्याचे निदर्शनास आले. सन २०१३ पर्यंत उद्रेकाची गती जास्त नव्हतीण सन २०१४ च्या ऑगस्ट पर्यंत एकुण ८५० प्रकरणे व ३३० मृत्यु या मर्स कोरोना विषाणुमेळे झाले. नंतर हा विषाणु वेगळया स्वरूपात डिसेंबर २०१९ मध्ये अनिश्चित कारणामुळे उद्भवलेल्या न्युमोनियाचे रूग्ण चीनच्या वृहान शहरातील रूग्णालयात दाखल झाले. हे रूग्ण वुहानच्या सीफुड व वेट ॲनिमल होलसेल मार्केटशी संबंधीत होते. प्रारंभीच्या तपासणी अहवालात त्यांना कोरोनाचा संसर्ग झाल्याची संभावना वर्तविली. ११ फेब्रुवारी २०२० ला WHO ने नव्या मानवी कोरोना विषाणु आजार २०१९ चे 'कोविड—१९' असे नामकरण केले.

**जागतीक व्यवस्थेतील बदल:—**

'कोराना'च्या संकटाने मात्र आंतराष्ट्रीय संघटनांच्या तसेच जागतिक 'गव्हर्नस' च्या संकल्पनेला आव्हान दिले आहे. काही प्रमाणात हे आव्हान ट्रम्प यांच्या 'प्रथम अमेरीका' या धोरणामुळे निर्माण झाले होते. कारण संयुक्त राष्ट्रांच्या काही संस्था तसेच नाटो सारख्या

संघटनेला आर्थिक मदत देण्यास काटछाट करण्यात आली. अमेरीकेच्या या धोरणाला काही अंशी आंतरराष्ट्रीय संस्थाच जबाबदार होत्या, हे जागतीक आरोग्य संघटनेच्या धोरनातून स्पष्ट होते. चीनविरूध्द टिका करण्याचे टाळणे, वेळेत योग्य त्या सुचना न देणे यामुळे या संघटनेच्या विश्वासर्हतेला तडा गेला. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीने देखिल 'कोरोना'च्या संदर्भात तातडीने चर्चा करण्यास टाळले. कारण चीनच्या धोरणावर टिका निर्माण होवु शकते. आज युरोपीयन युनियनला देखिल संध्याच्या समस्येला सामोरे जाण्यासाठी युरोपीय पातळीवर समाविष्ठ धोरण आखता येत नाही. असे जानवते.

लहान राष्ट्रे अजुनही संस्थाकडे आशेने वाट बघत आहे. जसे इराण ने आपल्यावरील संकटाला समोर जाण्यासाठी आंतराष्ट्रीय नाणेनिधीकडे मदत मागीतली आहे. अनेक आफ्रिकन देश जागतीक आरोग्य संघटनेकडे मदत मागत आहे. 'जी—२०' या प्रमाणे काहीतरी एकत्रीत धोरण आखावे यासाठी भारत देश पुढाकार घेत आहे. दक्षिण आशियात सार्क च्या पातळीवर धोरण आखण्याच्या बाबतीत तयारी भारत देशाची सुरू आहे. कोरोनाच्या समस्येला कसे समोर जायचे यावर राजकीय व्यवस्थेत अनेक नेते विचारविनीमय करीत आहेत.

चीन हा आपल्या शेजारी असला तरी शासन व्यवस्थेच्या बाबतीत तो भिन्न आहे. तिथे साम्यवादी विचारधारा असलेली एक पक्षीय हुकुमशाही अस्तीत्वात आहे. म्हणुनच लोकशाही व्यवस्था असणाऱ्या प्रदेशाचा तो विरोध करीत असतो. भारत तर जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. मग हा विरोध आणखी तिव्र होतो. भारत— चीन संबंध कधीच सलोख्याचे राहीले नाही. यासाठी इतिहास साक्ष आहे. भारताने प्रत्येक वेळी चीन पुढे मैत्रीचा हात पुढे केला. तो चीन हा लष्करी सामर्थ्याने भारतापेक्षा बलवान आहे. म्हणुन नव्हे तर भारताला लाभलेल्या शांती आणि अहिंसेच्या विचार धारेमुळे! भारत हा बुध्दाच्या व गांधीच्या शोती आणि अहिंसेला माननारा देश आहे. म्हणुनच तर चीन आपल्या सीमेच्या आत वारंवार सैनिक अतिक्रमन करीत असतानाही भारताने प्रत्येक वेळेत चर्चेतुन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे.

कोरोना जागतिक पातळीवर हाहाकार निर्माण केला असता, प्रत्येक राष्ट्र आपल्या परीने त्याला समोरे जात असले, तरी पारंपारीक स्वरूपाचे संघर्ष संपलेले दिसत नाहीत. दहशतवादी गटांनी केव्हातरी आपल्या गटातील साथीदारांना कोरोना बाधीत क्षेत्रात जावु नये, अशी सुचना दिल्याची एखादी बातमी येते. परंतु दहशतवादाच्या घटना तशाच चालु असल्याची जाणीव होत आहे. त्यात काश्मीरमधील दहशतवाद असेल किंवा सारीयातील हल्ला किंवा येमेनसारख्या ठिकाणी होणारा संघर्ष असेल, हे चालूच आहे. नाणेनिधिकडुन अर्थसाहाय्य मागणारा इराण आजदेखील आपल्या आखतात अमेरीकेला प्रत्युत्तर देण्याची भाषा करतो. अंतर्गत राजकारणात बिकट परीस्थीती असतानादेखिल पाकिस्तानकडुन सीमेवर गोळीबार होतो. जागतिक पातळीवरील चित्र बघीतले, तर अमेरीका—चीन दरम्यानच्या एका नव्या स्वरूपाच्या शीतयुध्दात खंड पडेल असे वाटत नाही. चीनच्या विरोधात कारवाई करण्याचा आग्रह अमेरीकेतील दोन्ही राजकिय पक्ष, रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट धरत आहेत. चीनवर जे व्यापारी निर्बंध घातले गेले, त्याचा अमेरीकेला फायदा होताना दिसुन येत आहे. अमेरीकेत उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे रोजगाराच्यासंधी उपलब्ध होतील. व्यापारी निर्बंधनामुळे चिनवर आलेले संकट हे 'कोरोना'मुळे आणखी घातक ठरत आहे. चीनच्या अर्थव्यवस्थेला धोका निर्माण झाला, तर त्याचे विपरीत परीणाम तेथिल कम्युनिष्ट पक्षाला भोगावे लागतील. आज चीन आक्रमक भुमिका घेत आहे. अमेरिका—चीन यांच्या दरम्यानच्या संघर्षाबरोबरीने रशियाच्या आक्रमक धोरनांनादेखिल 'कोरोना'मुळे अळथळा येईल असे वाटत नाही. चीन आणि रशिया या दोन्ही देशातील कोरोनाबाबतची खरी माहीती बाहेर उपलब्ध होत नाही. परंतु कोरोनाच्या संकटाचा त्यांच्या धोरणोवर फारसा परिणाम होईल असे वाटत नाही. आधी 'ब्रेक्झिट'आणि नंतर 'कोरोना' यामंळे ब्रिटनवर मात्र संकट येण्याची शक्यता आहे. ब्रिटन आणि युरोपियन युनियन दरम्यानच्या व्यापाराबाबतच्या वाटाघाटी कोणती दिशा घेतील हे बघण्यासारखे आहे. त्या दोघांना एकमेकांची गरज आहे. या गदारोळात भारताची परिस्थिती बरीच आशादायक वाटते. ज्या पध्दतीने भारताने 'कोरोना'च्या संकटाला तोंड दिले आहे आणि जागतीक पातळीवर पुढाकार घेतला

आहे. त्यामुळे भारताला फायदा होण्याची शक्यता आहे. जागतीक निर्णय प्रक्रियेतील भारताचे स्थान दृढ होवु शकते.

म्हणुनच जागतीक पातळीवर बदल होतील काय, याचे उत्तर 'नाही'असेच द्यावे लागते. जुने संघर्ष जसेच चालु राहतील कदाचीत त्याचे स्वरूप बदलेल. त्या संर्घषाचे आर्थिक, सांस्कृतीक, राजनैतिक परीणाम अधिक ठळकपणे समोर येईल.

**निष्कर्ष:—**

कोरोनाच्या संकटाने अख्या जगात मंदीचे वातावरण निर्माण केले असुन आंतराष्ट्रीय क्षेत्रात प्रत्येक देश आपआपल्या परीने कोरोनामुक्त होण्याच्या मार्गावर आहेत. आयातीवर जसा परीणाम झाला तसाच निर्यातीवर सुध्दा झाला आहे. जागतीक व्यापार संघटनेच्या अभ्यासानुसार आधीच बहुसंख्य आशियाई देशाची निर्यात आयातीपेक्षा खुपच कमी आहे. जी निर्यात आहे ती ठप्प झाली आहे. आशियाई देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा परीणाम झाला आहे. उत्तर अमेरीकेच्या निर्यातीलाही प्रचंड मोठा फटका बसला आहे. आशियाई देशाना या संकटातुन सावरण्यासाठी अनेक तातडीचे प्रयत्न सुरू आहे. नाहीतर आशियाई देशात भुकबळी वाढायला फार वेळ लागणार नाही. जागतीक व्यापाराच्या अनिश्चिततेची ही पीरस्थिती किती दिवस चालेल याचा अंदाज नाही. कारण कोरोना प्रत्येक देशाला गंभीर्यतेची समस्या बनली आहे.

केवळ दोन महिण्यातच जागतीक व्यापारातील उलाढाल १२ ते ३२ टक्क्यांना कमी झालेली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनही या संदर्भात धोक्याची घंटा वाजविली आहे. म्हणजेच कोरोनामुळे जगाच्याच डोळयात पाणी आणले आहे. केवळ तीन महिण्यांपुर्वी जागतीक विकास या वर्षी किमान ३—३ टक्यांनी वाढेल असा अंदाज वर्तविण्यात आला होता. पण विकास दुरच आताच्या घडीला जागतीक विकासात तब्बल ३ टक्क्यांनी घट झाली आहे. वास्तविकता जागतीक क्षेत्रातील विकासाची गती कोरोनाच्या विषाणुमुळे विविध प्रकारच्या अनुमानाने विकासदरात फार दरी निर्माण होवुन जागतीक विविध देशात संकटाचे तांडव आढळताना दिसुन येते.

संदर्भ:—

१) लोकमत पेपर— नागपुर, गुरूवार दि. १६ एफ्रिल २०२०—पृ. ६
२) लोकशाही वार्ता—नागपुर, शनिवार दि. ३० मे २०२०.
३) सकाळ पेपर—नागपुर, दि. १९ मे २०२०